# प्रकरण दुसरे

# ज्ञानेश्वर कोळी यांच्या कवितेतील आशयविश्व

## प्रकरण दुसरे

# ज्ञानेश्वर कोळी यांच्या कवितेतील आशयविश्व

१) प्रास्ताविक

२) ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेतून अभिव्यक्त झालेल्या काव्यविषयक जाणिवा

३) ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेतील जीवनविषयक जाणिवा

४) ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेतील सामाजिक जाणिवा स्वरूप

५) ज्ञानेश्वर कोळीं यांच्या कवितेतील प्रेमभावनेचे चित्रण

६) ज्ञानेश्वर कोळीं यांची निसर्ग विषयक कविता

७) समारोप

---

## प्रकरण दुसरे

# ज्ञानेश्वर कोळी यांच्या कवितेतील आशयविश्व

### १) प्रास्ताविक :

मागील प्रकरणात १९८० नंतरच्या मराठी कवितेचे स्वरूप आपल्यासमोर उभे केले आहे. १९८० नंतरच्या मराठी काव्याचे वेगळेपण दाखविण्याचा प्रयत्न करून या काव्याचे विशेष व मर्यादा सांगितलेल्या आहेत. सदर प्रकरणात १९८० नंतरचे एक महत्त्वाचे कवी श्री ज्ञानेश्वर कोळी यांच्या कवितेचे स्वरूप पाहणार आहोत.

१९८० नंतर मराठी कवितेमध्ये सामाजिकतेचे भान प्रभावीपणे आविष्कृत होऊ लागले. विशेषत: ग्रामीण भागात मानवी जीवनात जे बदल होऊ लागले त्या बदलाचा एकूण ग्रामीण व्यवस्थेवर, तेथील कुटुंबसंस्था, शेती, माणसे यांच्यावर झालेला परिणाम आणि या परिणामातून निर्माण झालेली एक अस्वस्थ करून टाकणारी सामाजिकता. ही सामाजिकता, ग्रामीण मनाची संवेदनशीलता, सामाजिक भान इ. आविष्कार विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या कवीनी आपल्या कवितेत साकार करण्याचा प्रयत्न केलेला आहे. यापैकी प.महाराष्ट्रातील एक तरूण संवेदनशील मनाचा कवी म्हणजे ज्ञानेश्वर कोळी होय. त्यांचे एकूण ४ काव्यसंग्रह प्रकाशित झालेले आहेत. या काव्यसंग्रहातील त्यांच्या कवितांचा अभ्यास येथे करावयाचा आहे. ज्ञानेश्वर कोळी हे १९८० नंतरचे एक महत्त्वपूर्ण कवी आहेत. 'जगणे माझे' (१९९१), 'आयुष्याच्या वाटेवर' (१९९६), 'आकाश पेलताना' (१९९९) आणि 'घन दाटलेले' (२००२) या काव्यसंग्रहांच्या अनुषंगाने त्यांच्या कवितांचे विशेष पाहताना कोळींच्या जीवन वाटचालीचा परामर्श घेणे मला इथे आवश्यक वाटते.

ज्ञानेश्वर कोळींच्या बालपणी घरात अठराविश्व दारिद्रय, गरिबी आणि उपासमारीशी टक्कर देत कवी शाळेत गेले खरे. परंतु दहावीत शिकत असताना

मजुरीसाठी त्यांना शाळा सोडावी लागली. भुकेच्या प्रश्नापुढे ज्ञान लालसा टिकू शकली नाही. विहिरीवर, शेतात, पिठाच्या गिरणीत मिळेत तसे काम करून भाकरीचा प्रश्न सोडवण्याचा ते प्रयत्न करू लागले. आपल्या 'घन दाटलेले' काव्यसंग्रहाच्या प्रस्तावनेत ते लिहितात, ''भूक आणि गरिबीच्या खेळात पुन्हा शाळा सोडावी लागली आणि दोन वेळच्या जेवणासाठी नांदोरे येथे गुराख्याचे काम करू लागलो. दरम्यानच्या काळात अनेकांचे पाय धरले. अनेक अधिकाऱ्यांच्या भेटी घेतल्या. ही सगळी माणसे जवळून पाहिली. त्यांचा अभ्यास केला. त्यांचे आचार पाहिले, विचार पाहिले ही माणसं वरून स्वच्छ दिसतात पण आतून खूपच घाण असतात. यामुळे अस्वस्थ वाटायचे, मन पेटून उठायचे, डोक्यात विचारांचे काहूर माजायचे आणि याच रसायनातून शब्दांच्या रांगा पोटातून ओठात येऊ लागल्या.''[१]

ज्ञानेश्वर कोळींची कविता अशी अनुभवातून स्फुरली आहे. उपासमार, दारिद्रय, अन्याय, लाचारी, मानापमान यांचे चटके सोसलेले कवीचे अनुभव अधिकाधिक ज्वलंत वाटतात. ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेबद्दल डॉ. बाबुराव गुरव लिहितात, ''कटू अनुभवाने करपलेल्या कविच्या अतिसंवेदनशील मनाने मानवी स्वभावांचे अनंत नमुने पाहिले आहेत. गरीबांची असहायता, अगतिकता, गुलामी, मजबुरी, अपेक्षा, अपयश, फसवणूक, स्वप्नभंग, शरणता, तीव्र संताप, चीड, भयग्रस्तता अशा कितीतरी भावमुद्रांनी त्यांची कविता सजीव बनली आहे. कवितेतील दर्शन अंतर्मुख करणारे आहे. एवढे भेदक अनुभव घेऊनही कवीने वास्तव जीवनात सांभाळलेला तोल ठेवलेला संयम पाहिल्यानंतर या कविविषयी सहानुभूतीने मन भारावल्यावाचून राहत नाही. ज्ञानेश्वर कोळी यांची कविता अगतिकतेच्या भयकंपाने थरारलेला शब्द आहे. हा मराठीतला अव्वल दर्जाचा एक महत्त्वाचा कवी आहे. सर्वव्यापी प्रतिकुलतेवर मात करत कविता जगतो आहे.''[२]

ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेचा अभ्यास केल्यानंतर गुरव यांच्या वरील मताचा प्रत्यय वाचकाला आल्याशिवाय राहत नाही. नाद, लय, ताल, सूर यात रंगणारी कोळींची कविता वाचकाला गुणगुणाविशी वाटते व जाणून घ्यावीशी वाटते. कवितेतून व्यक्त होणारे अनुभव वाचकाला अंतर्मुख करतात. कवितेतील दु:ख-भोगाची यातनामयी जाणीव मनाला अस्वस्थ करणारी आहे. त्यांच्या कवितेतून व्यक्त होणारे जगणे हे त्यांचे एकट्याचे रहात नाही तर त्याला प्रातिनिधिक स्वरूप प्राप्त होते व त्यांच्या व्यक्तिगत अनुभवांना सार्वत्रिकतेचे स्वरूप मिळते. आपलेच दु:ख, वेदना, संघर्ष कवीने मांडलेला आहे असे भासण्याइतपत कोळींची कविता वास्तवपूर्ण व जीवनस्पर्शी ठरते. त्यांच्या कवितेबद्दल राजा माळगी लिहितात, " 'जगणे माझे' सांगत हा कवी 'आयुष्याच्या वाटेवरून' जाऊ लागतो, त्यावेळी पहिल्या संग्रहातील (जगण्यासाठी) करावी लागणारी धडपड या दुसऱ्या काव्यसंग्रहात स्थिर होत असल्याची जाणीव होते आणि एक आत्मविश्वासपूर्ण वाटचालीची जिद्द पाहावयास मिळते. मात्र या काव्यसंग्रहातील संघर्ष, वेदना आणि वास्तव यांना वेगळाच आकार आला आहे. कोळी यांचा संघर्ष केवळ प्रस्तापितांशी नाही. कधी कधी तो स्वत:शीही संघर्ष करतो. या संघर्षातून जे अनुभव शब्दबद्ध होतात ते अस्सल ठरतात. यातील वेदना जिव्हारी आहेत आणि वास्तव सत्यस्पर्शी आहे."[३]

अशा कोळी यांच्या काव्यसंग्रहातील कवितांचे स्वरूपविशेष विशिष्ट वर्गवारी करून पाहता येतील ते पुढीलप्रमाणे -

## २) ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेतून अभिव्यक्त होणाऱ्या काव्यविषयक जाणिवा :

ज्ञानेश्वर कोळींची कविता ही अनुभवातून व्यक्त झालेली कविता आहे. वैयक्तिक जीवनात व समाजजीवनात ज्या-ज्या वेळी मनाला अस्वस्थ करणाऱ्या

घटनांचा अनुभव आला त्यावेळी त्यांनी मनातील विचारांना, भावनांना काव्यरूप दिले. आपल्याला कवी व्हायचे आहे, कवी म्हणून समाजात नाव मिळवायचे आहे ही भूमिका त्यांची कधीच नव्हती. तथापि, बालपणापासूनच त्यांना शब्दांचे सुरांचे वेड होते. ते वेड कसे निर्माण झाले ? याबद्दल त्यांनी दिलेली आठवण अर्थपूर्ण आहे.

"आमच्या चौथीच्या वर्गात (कै.) बाबर गुरूजींनी दत्तात्रय कोंडो घाटगे, यांची 'बा, नीज गडे नीज गडे लडीवाळा !', आणि रेव्हरंड ना.वा. टिळकांची 'क्षणोक्षणी पडे ऊठे परीबळे ऊडे बापुडी !' या दोन कविता गाऊन शिकवल्या. ताल, सूर आणि गुरूजींचा करूणामय आवाज यामुळे सगळा वर्ग चिडीचूप झाला. गुरूजींच्या डोळ्यातून एकसारखे पाणी वहात होते. धोतराच्या एका कोपऱ्याने गुरूजी डोळे पुसायचे. आम्ही लहान मुलेही डोळ्याचे पाणी पुसत पुसत मंत्रमुग्ध झालो होतो. संपूर्ण दिवस या दोन कवितेतच गेला. सायंकाळी सहा वाजता शाळा सुटली. कविता म्हणतच मी घरी आलो. माझ्या डोळ्यातून पाणी येत होते. आई अंगणातच जळण मोडीत होती. मला पाहताच ती म्हणाली, 'का रडतुयास रे न्यानू ?' "

"न्हाय आये ! बाबर गुरूजींनी लय चांगली कविता शिकवली. तू ये इकडं ! तुला म्हणून दाखवतो आणि गुरूजींच्या तालासुरात आईला कविता म्हणून दाखवली."[४]

ज्ञानेश्वर कोळींची कविता त्यांच्या जगण्याचा प्रतिशब्द आहे. आयुष्यातील अनुभूतीच त्यांनी शब्दात साकारली आहे. आपले काव्य सुंदर करावे, नटवावे हा ध्यास कवीला नाही. अलंकाराचा सोस नाही जे जगण्यात आले, भोगावे लागले, सोसावे लागले त्याचीच अभिव्यक्ती काव्यात झालेली आहे. म्हणून ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेला वास्तवाची जोड आहे. कवितेविषयीची आपली भूमिका मांडताना 'आयुष्याच्या वाटेवर' काव्यसंग्रहाच्या प्रस्तावनेत ते लिहितात –

16117

''वास्तवतेचं जीवन जगताना मी समाज, समाजाबरोबर असणारा प्रचंड निसर्ग आणि समाजातील माणसं, एकूणच घडणाऱ्या दैनंदिन घटना, उघड्या डोळ्यांनी सोसून त्यावरच जगत राहिलो. वेडेवाकडे तोंड करून अजीर्ण होईपर्यंत ते अनुभव खातच राहिलो, तर कधी पोट भरल्या तृप्तीच्या आनंदाचा ढेकर दिला. ते माझं रोजचंच अन्न आहे. या अभिसरणातून ओठातून अलगदच शब्द बाहेर पडले, लोक या शब्दानाच 'कविता' म्हणू लागले.''[५] कोळींच्या कवितेची अभिव्यक्ती अनुभवातून झालेली असल्याने तिच्यात एक प्रकारचा जीवंतपणा, उत्कटपणा व प्रामाणिकपणा आहे.

## आयुष्याला व्यापून राहिलेली भूक :

'भूकेचा प्रश्न', 'भाकरीची शाश्वती' कोळींच्या कवितेच्या केंद्रस्थानी आहे. दारिद्रय आणि अवहेलनेमुळे निर्माण होणारी घुसमट, असाह्यता त्यामुळे उद्भवणारी चीड आणि प्राप्त परिस्थिती बदलण्यासाठी बंड करणारे मन त्यांच्या कवितेतून दिसून येते. भाकरीच्या अशाश्वतीमुळे येणारी अगतिकता त्यांच्या अनेक कवितेतून दिसते. 'जगणे माझे' (१९९१) या आपल्या पहिल्याच कवितासंग्रहातील पहिल्या कवितेत ते लिहितात,

''कविते !
एखादं प्रेमपत्र तुला लिहिलं असतं
उसन्या अलंकारांनी तुला नटविली असती
निदान तुझ्या लक्तरावर एखादा
कशिदा तरी काढला असता
पण -
उगवणारी माझी प्रत्येक पहाट भूक होऊनच येते
आणि.... त्यावेळी

अस्वस्थ होतात माझ्या झोपडीचे वासे
क्षितिजाला क्षय झाल्यासारखे ''

('कविते', जगणे माझे, पृ.१)

कवीच्या आयुष्याला व्यापून राहिलेली भूकच त्यांच्या कवितेला जन्म देते. त्यांच्या कवितेतील चिमणा-चिमणी चाऱ्याचाच हिशोब करतात. पाखरांचे आयुष्यही थंडीने गोठलेले आहे. निवारा नसणारे आदिवासी मंदिराच्या आडोशाला यावेत तसे कवीकडे शब्द येतात. ते शब्द कवीच्या जखमा अधिकच बोचऱ्या करतात.

''कधी शब्द असे येतात
मंदिराच्या आडोशाला आलेल्या आदिवाशासारखे
त्यांच्या झोळीतून बदबद पडणारी भूक
वाटग्यातल्या पाण्यात भिजून चिंब होते
अशावेळी मला तुझे हात हवेत !''

('शब्द असे येतात', घन दाटलेले, पृ.४१)

**वेदनेतून जन्मलेली कविता :**

आज शिक्षण खेड्यापाड्यात पोहचले. ग्रामीण भागातील उपेक्षित, दुर्लक्षित, तळागाळातील वंचित वर्ग शिकू लागला. आपल्या जीवनाचा विचार करू लागला. शिकूनही नोकरी नाही, स्थिरता नाही, भाकरीचा प्रश्न सुटलाच नाही. हक्कासाठी भांडूनही पदरी काही पडलेच नाही. तेव्हा हताश, निराश मन:स्थितीचा तरूण उद्‌ध्वस्त आयुष्य जगू लागला. त्याच्या विदीर्ण आणि वैफल्यग्रस्त मनातून वेदनेचा हुंकार उमटू लागला. तिच त्या उपेक्षित वर्गाची कविता ठरली. ज्ञानेश्वर कोळींची कविता या उपेक्षित वर्गाचे प्रतिनिधित्व करते. शिकूनही कवीला इप्सित साध्य करता येत नाही. स्वप्ने धुळीला मिळतात तेव्हा निर्माण होणाऱ्या पोटतिडकीतूनच काव्य जन्म घेते.

''जगण्यातल्या कल्पना – महत्त्वाकांक्षा
उद्‌ध्वस्त झाल्या तेव्हा

आत्महत्त्या करावीशी वाटली
पण..... त्यावेळी....
पोटाचेही दिवस संपले होते
त्यातून पोटतिडीक जन्माला आली
मी तिला कविता म्हणू लागलो !
मी तिला कविता म्हणू लागलो !''

('शिकलो तेंव्हा....' आयुष्याच्या वाटेवर, पृ.२५)

कवीला भोगाव्या लागणाऱ्या व्यथा वेदनाच कवितेला जन्म देतात. घरात अठराविश्वे दारिद्रय. चटणी नाही, पीठ नाही, घर उदास-भकास आहे तरीही कवी कवितेची साथ मात्र सोडत नाही. उलट कष्ट, आपत्ती हीच कवितेची जननी बनते. कविता त्याला जीवन जगण्याला सोबत तर करतेच पण जीवन संपल्यानंतर अस्तित्वाची निशाणी कविताच आहे असे कवीला वाटते. कष्ट सोसून-सोसून कवीचा जीव कासावीस होतो. अनेक आपत्तींना तोंड देऊन थकून जातो. तरीही आत्महत्येचा विचार तो मनात आणत नाही. कारण आपण आत्महत्या केली तर आपल्या काव्यरूपी कळ्या अनाथ होतील असे त्याला वाटते. अनंत काळच्या वेदना, कष्टाचे वळ आणि दारिद्रय यातून कवीच्या उरात असह्य कळा उठतात. या वेदनांचे शब्दरूपी चित्रण कवीची कविता ठरते.

''मग तूच सांग सखे या जीवघेण्या कळा कुठवर सोसू ?
म्हणून कित्येक कवितांनी माझ्यापोटी जन्म घेतला
आपत्तीतून-कष्टातून-पोटतिडकीतून

('वेदनांचा हुंकार', आयुष्याच्या वाटेवर, पृ.१६)

किंवा -

''किती शिणलो दमलो
तरी जगत राहिलो

दु:ख अंगाशी झोंबता
आणि दगड जाहलो ।।
जगण्याचा मुशीतून
शब्दफुले उमलली ।
घामाघुम अंग माझं
तिथं कविता जन्मली ।।''

(घन दाटलेले,पृ.१)

कवीच्या जगण्याचा मार्ग काट्याकुट्याचा आहे, अडचणीचा आहे. या मार्गावर कष्ट आहे, दारिद्रय आहे, उपेक्षा व मानहानी आहे. जगताना रोज नव्याने जन्म व्हावा एवढी घुसमट आणि संघर्ष आहे. या धकाधकीत कवी दमतो, शिणतो, दु:खाशी झगडत राहतो जीवाची घालमेल होते आणि त्यातून कविता जन्माला येते. ही कविता कवीच्या जगण्याला नवी उमेद देते. मात्र कविता भेटली नाही, शब्द सुचले नाहीत तर मात्र कवीचा जीव कासावीस होतो.

ज्ञानेश्वर कोळींची कविता वास्तवातून जन्मली आहे. कवीला घटना प्रसंग शोधावे लागत नाही, शब्द आठवावे लागत नाहीत. रोजचे जगणेच त्यांना कवितेचे विषय पुरवते. आयुष्यात घडणाऱ्या छोट्या छोट्या प्रसंगातून काव्य स्फुरते. काव्य आणि कवी यांचे नाते अतूट आहे. कवी कवितेशी संवाद साधतो. तिची विचारपुस करतो. रक्तानं नाती जपावीत, तसे कवीने कवितेला जपले पाहिजे. कवितेचे दु:ख न सांगता कवीला उमजले पाहिजे असे कोळींना वाटते. म्हणूनच 'अंगणात बसलेली कविता' या कवितेत ते कवी आणि कवितेचे नाते सांगताना ते म्हणतात,

मी म्हणालो,
''यापूर्वी काहीच सांगितले नाहीस
तिच्या आसवांचे शब्द ठिबकत म्हणाले,
कवितेनं कविता कधी सांगायचं असतं ?

नाही रे !

डोहानं पाणी,

रक्तान नाती

आणि हृदयान काळीज जपायचं असतं !!''

('अंगणात बसलेली कविता', घन दाटलेले, पृ.४३)

आध्यात्माचा वारसा, अभंग, ओव्या, कीर्तनाची परंपरा, ज्ञानदेव-तुकारामादी संतांची शब्दसंपदा, भोवतालचा निसर्ग या सर्वातून कवीला काव्याची प्रेरणा मिळते. घरात दारिद्र्य असले, किमान गरजा भागल्या नसल्या तरी कवी चिंता करीत नाही. कारण आयुष्य नश्वर आहे, क्षणाचाही भरवसा नाही, काव्य मात्र चिरंतन आहे याची कवीला जाणीव आहे. शब्दाच्या सहाय्यानेच संत महंताप्रमाणे पैलतीरी पोहचता येईल यावर कवीचा विश्वास आहे. आयुष्याची नश्वरता आणि शब्दश्रीमंतीचे महत्व सांगताना कवी म्हणतो,

''झालो कुबेर शब्दांचा

पैलतीरी माझा गाव

धन्य धन्य विठूराया

प्राण पाण्यातली नावं ।।''

('पैलतीरी माझा गाव, आकाश पेलताना, पृ.१०)

ज्ञानेश्वर कोळींनी ज्या काव्यविषयक कविता लिहिलेल्या आहेत त्यातून काव्यनिर्मिती प्रक्रिया व काव्याच्या प्रयोजनाविषयी काही विचार व्यक्त केले आहेत. कोळींची कविता ही त्यांच्या जगण्यातून जन्मलेली कविता आहे. त्यांच्या व्यथा-वेदना, संघर्ष, दुःख, अगतिकता, कष्ट या सर्व गोष्टींना शब्दरूप लाभलेले दिसते. कविता किंवा शब्द हेच कवीचे सखे-सोयरे बनले आहेत. म्हणूनच कविता नाही सुचली तर कवीचा जीव कासावीस होतो आणि कविता सुचताच सातसमुद्र

मिळाल्याचा आनंद त्यांना होतो. 'आयुष्याच्या वाटेवर' या कवितासंग्रहाच्या प्रस्तावनेत ते लिहितात,

''एखादी कविता स्फुरली की, हत्तीचं बळ मिळतं. सात समुद्र मिळाल्याचा आनंद होतो. येणाऱ्या परिस्थितीशी झुंज देण्याचं सामर्थ्य मला आणि माझ्या अनेक बांधवांना मिळतं !''[६]

कवीचे आयुष्य दु:खाने, संघर्षाने झाकोळलेलं आहे. मात्र कवीच्या रखरखत्या जीवनात कवितेनेच थोडाफार ओलावा निर्माण केला. दारिद्र्य, उपासमारी, लाचारी या सर्वावर मात करण्यात कवी यशस्वी झालेला दिसतो. त्याचे श्रेय त्यांच्या कवितेलाच द्यावे लागेल. वेदनेतून जन्मलेले त्यांचे शब्दच त्यांच्या दु:खमय आयुष्यातील वेदनेची दाहकता कमी करू शकले आहेत.

## ३) ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेतील जीवनविषयक जाणिवा :

जीवन जगत असताना वाट्याला येणारे दु:ख, त्या दु:खाशी करावा लागणारा संघर्ष, जीवनाची नश्वरता, जगण्यात रस नसतानाही करावा लागणारा जीवनप्रवास आयुष्यात कोणी कोणाचे नाही ही भावना, यंत्रवत जगणे, वैफल्यग्रस्त जीवन, दारिद्र्याने पीडलेले जीवन, होणारी मानहानी या व अशा कितीतरी जीवनविषयक जाणिवा ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेतून प्रकट झाल्या आहेत. त्यांच्या कवितेतील जगण्यात सोसणे आहे,थकणे आहे परंतु आयुष्यातून माघार घेणे मात्र नाही. प्रसंगी ते संकटाना व दु:खानाच आव्हान देऊन त्यांच्याशी दोन हात करायला उभे ठाकतात.

### दु:खाने व्यापलेले जीवन :

जीवन म्हणजे दु:ख आणि वेदनांची मालिकाच ! आयुष्यात क्षणाक्षणाला दु:खाशी सामना करावा लागतो. तरीही माणूस ते दु:ख पचवत जगतच राहतो. पोट भरण्यासाठी माणूस कष्ट करीत राहतो. एखादा व्यापारी खूप पैसे कमवतो परंतु त्या

पैशाच्या काळजीने त्याची झोप उडते. नोकरी करणाऱ्या माणसांचा महिना भरला की पगार मिळतो. पण त्यांच्याही मागे देणेकऱ्यांचा तगादा असतो. वेगवेगळे आजार माणसाचे जगणे मुश्किल करून सोडतात. पण हे सर्व पचवीत माणूस जिद्दीने जगत राहतोच. कारण मरणापेक्षा वेदना भोगणे त्याला छान वाटते.

"भजी तळता हात भाजतो
कष्ट करून रक्त ओकतो
आडतीवरच्या व्यापाऱ्याचा,
पैसे मोजून हात दुखतो
पैसा-पैसा म्हणून-म्हणून झोप त्याला पळवून लावते
मरणापेक्षा वेदनांची गंमत फार छान असते"

('गंमत फार छान असते !!', आयुष्याच्या वाटेवर, पृ.१८)

जीवन जगताना येणारे नैराश्य उदासिनता 'कंदील' (आयुष्याच्या वाटेवर, पृ.२१) या कवितेतून कवीने व्यक्त केलेली आहे. जीवनात केवळ अंधार दाटून येतो आणि जीव कासावीस होऊन जातो, कंदीलाप्रमाणे तेवणारे आयुष्य हतबल होते आणि काळीज जळत राहते. ही भावना प्रस्तुत कवितेतून प्रकट होते. दु:ख भोगत जगणारा जीव सुखाच्या शोधात असतो. आजचे दु:ख उद्या संपेल आणि जीवाला विसावा मिळेल असा आशावाद बाळगून माणूस जगतो. परंतु प्रत्येकवेळी पदरी निराशाच येते. आजूबाजूला असणारी माणसेही केवळ सुखाचीच वाटेकरी असतात. दु:खात मात्र कोणी कोणाचे नसते. अशावेळी कवीला दु:ख पचवत जगणारी माणसे मुंग्यांच्या रांगेप्रमाणे भासतात. प्रत्येकाने आपल्याला पेलेल, झेपेल तेवढं दु:ख उराशी कवटाळलेलं आहे व निघाला आहे.

"अज्ञानाच्या बाजारात
चाले दु:खाचीच बोली

दु:ख ऊसाशी घेऊन
रांग मुंग्यांची चालली ''

('रांग मुग्यांची चालली', आकाश पेलताना, पृ.९)

वाट्याला दु:ख आले तरी कवी जगण्यातून माघार घेत नाही. प्राप्त परिस्थिती स्वीकारून जगतच राहतो. दु:ख सहन करीत जातो. दु:खाच्या जखमा त्याच्या पाचवीलाच पुजलेल्या ! सतत दु:खाचीच सोबत ! या सोबतीतून शेवटी कवीला या दु:खाची सवयच जडून गेली. दु:खाची तक्रार करणे त्याने बंद केले. वाट्याला येईल ते भोगत राहिला. आणि अखेर कितीही मोठे दु:ख वाट्याला आले तरी ते त्याला हलके वाटू लागले हीच भावना 'सवय' कवितेत व्यक्त होते.

''जखमा पाचवीलाच पुजल्यानं
दु:खाची सवय झालीय
आता -
दु:खाचा पहाड जरी कोसळला तरी
तो सोपा - सोपा वाटतोय !!''

('सवय', आयुष्याच्या वाटेवर, पृ.४१)

हळूहळू या दु:खाची सवय होते आणि कवी दु:खाला घाबरेनासा होतो. उलट दु:खाच्या स्वागताला उभा राहतो व त्यांना येण्याचे आव्हान देतो. पंजर झालेल्या आपल्या शरीररूपी घरात पहिल्या दु:खाचे ठसे अजून ताजे आहेत. आता मात्र कवी पहाडासारखा खंबीर झाला आहे. त्याचा स्वाभिमान जागृत आहे. शिवाय जीवघेणी प्रतिभा त्याच्या जवळ आहे. स्वत:च्या आयुष्याला, नशिबाला टाके घालून दु:खासाठी स्वत:च्या जीवनाचा 'झब्बा' शिवून द्यायलाही कवी तयार आहे असे विचार 'या रे दु:खाना या !' (आयुष्याच्या वाटवरे, पृ.४४) या कवितेत व्यक्त झाले आहेत.

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

**जीवनाची नश्वरता / क्षणभंगूर जीवन :**

माणूस आयुष्यभर सत्ता, संपत्तीच्या पाठीमागे धावत राहतो. प्रबळ आशा बाळगतो, मोठमोठ्या महत्त्वाकांक्षा ठेवतो. स्वत:च्या देहावर प्रेम करतो. घर, झाडे, पाणी इत्यादीवर आपली मालकी सांगतो. सर्व गोष्टींचा मालक आपणच आहे असे त्याला वाटते. परंतु नश्वर असणारा हा देह एक दिवस निमाला म्हणजे कशावरही आपली मालकी राहणार नाही हा विचार 'मालक' कवितेत आला आहे.

''मी मालक आहे स्मशानाचा
स्मशानातल्या.....
मातीचा......
दगडाचा.......
आणि माझ्यापुरत्या जागेचा !''

('मालक' जगणे माझे, पृ.१७)

किंवा –

''दोरीतल्या बाहुलीसारखं
नाचवीत आहे परमेश्वर एकट्यालाच
जगाच्या रंगभूमीवर
भूमिका करायची आहे
जमली नाही जमली तरी
पडदा हा पडणारच आहे !
अखेरची घंटा वाजणार आहे !!''

('कोठून आलो ?', जगणे माझे, पृ.३९)

आपण कोठून आलो ? जाणार कुठे ? या प्रश्नाच्या भोवऱ्यात सर्वजणच आडकतात. परंतु एक ना एक दिवस जावे लागणार हे मात्र नक्की ! माणसाला आपले नावलौकिक मागे उरावे असे वाटते. आपला पुतळा उभा करावा असे वाटते. परंतु या

पुतळ्यांची अवस्था काय होते याचे वास्तव चित्रण 'पुतळा' कवितेत आले आहे. कवी आपलाच पुतळा आपल्या डोळ्यांनी पहातो. भिकारी या पुतळ्या जवळ लोळतात, गाढवे थांबतात,उन्हात तापणाऱ्या पुतळ्यावर कावळे-पक्षी विष्टा टाकतात. कधी-कधी पुतळ्यासाठी दंगल पेटते. तेव्हा पुतळा महत्त्वाचा नसून माणूस महत्त्वाचा आहे. आयुष्यभर माणूस जपावा, माणूस पुजावा कारण एक ना एक दिवस मरण निश्चित आहे.

''जीवीचे जीवन
अटळ मरण
नाही विसरून... चालणार !!'' (घन दाटलेले, पृ.१५)

आयुष्य क्षणभंगूर आहे, नश्वरआहे याची जाणीव कवी करून देतो व माणूसकी जपण्याचे आवाहन करतो. 'तसे हे घर' (घन, पृ.३५) कवितेतून जीवनाची नश्वरता स्पष्ट केली आहे.

## आयुष्याला आलेले यांत्रिकपण :

माणसाने भौतिक प्रगती केली पण त्याचे जीवनही यंत्रवत झाले. सर्व कृतीत कृत्रिमता आली. नैसर्गिक जगणे, त्या जगण्यातला उत्साह, चैतन्य नाहीसे झाले. शहरीकरण झाल्याने जगण्याची पद्धतच बदलून गेली. पूर्वीप्रमाणे कोंबडा आरवणे बंद झाले, पहाटेची पक्षांची किलबिल थांबली. कॅसेटच्या धुनने माणूस जागू लागला. दिवसभर यंत्रासारखा जगू लागला. पोटासाठी धावू लागला. पैसा, प्रतिष्ठा, सत्ता, पुरस्कार मिळवणारा माणूस खरा आनंद मात्र हरवून बसला आहे. ही खंत कवीने 'दिवसभर' कवितेत व्यक्त केली आहे.

''उन्हाचे पंख झेपावू लागले की,
मी पुन्हा बाहेर पडतो

माणसांच्या कळपात
दिवसभर ।।''

('दिवसभर', आकश पेलताना, पृ. ४५)

'फक्त प्रवासआहे' (आकाश पेलताना, पृ.३३) या कवितेतही दु:ख दारिद्रय सहन करत केवळ जीवन मिळाले आहे म्हणून जगणाऱ्या जीवांचे वर्णन आलेले आहे. ही माणसे आयुष्य निरर्थकपणे, यंत्रवतपणे जगत राहतात. त्यांचे जीवन म्हणजे फक्त प्रवास असतो. दु:ख, वेदना, घात, आघात सर्व काही सोसूनही जगणारी ही माणसे आयुष्यभर उरात शल्य घेऊन जगतात. त्यांच्या आयुष्यात कधीच वसंत फुलत नाही नियती मात्र त्यांना हसत राहते. परिस्थितीपुढे शरण गेलेली, वाकलेली ही माणसे कधी हसतात, कधी रडतात आणि कुणाला काही न सांगता यंत्रवत वेगात चालतात. स्वार्थापोटी लाचारी पत्करतात, शिव्या सहन करतात. फायद्यासाठी अपमानही सहन करतात. विज्ञान युगात वावरणाऱ्या या लोकांना केवळ सुखाचाच हव्यास आहे. धन मिळवणे हाच केवळ त्यांच्या जगण्याचा उद्देश आहे. कण्हत कण्हत आक्रोश करत ते मूकजीवन जगत आहेत.'

''धुक्यांची पहाट
विज्ञान युगात
तंत्राचा आघात
दारोदारी ।।
धनाचाच ध्यास
सुखाचा हव्यास
किती आटापीटा
चाललाय ।।'' ('रांगावरी रांगा', घन दाटलेले, पृ.३)

'माझ्या अंगणात' (आयुष्याच्या वाटेवर, पृ.३८) या कवितेत यांत्रिकी-करणाच्या परिणामाचे वर्णन आले आहे. जीवन जगत असताना अनेकजणांची सोबत

मिळते. परंतु प्रत्यक्षात मात्र कोणी कोणाचे नसते हाच अनुभव कवीला आला. अनेक माणसे त्याच्याजवळ आली परंतु ती शेवटपर्यंत सुख-दु:खात भागीदार झाली नाहीत. आज काळ बदलला. माणूस माणसापासून दुरावला, रक्ताची नातीही बेगडी बनली ही खंत कवी ज्ञानेश्वर कोळी आपल्या कवितेतून व्यक्त करतात.

''नाती विखुरलेली जगण्यात गुंतलेली
रक्तातलेच नाते रक्तास का कळेना ''

('घरकुल', घन दाटलेले, पृ.८)

किंवा -

''आयुष्य जगताना हर एक भेटलेला
हासून ते पळाले जगण्यावरून माझ्या ''

('दारावरून माझ्या',आकाश पेलताना, पृ.१२)

आयुष्यभर बहीण-भाऊ, बायको-मुले, आई-बाप यांच्यासाठी कष्टणारा माणूस शेवटी स्वत: मात्र एकटाच असतो. त्याच्यासाठी शेवटी पिंडाचा कावळा सुद्धा नसतो. आयुष्यभर केवळ दुसऱ्यासाठीच जगणाऱ्या माणसाची अवस्था डोळे असूनही आंधळा असल्याप्रमाणेच असते ही भावना 'नाही-नाही' (घन दाटलेले, पृ.५) या कवितेत दिसून येते.

**जीवन एक संघर्ष :**

जीवनात संकटे, दु:ख, व्यथा-वेदना या येणारच ! दिवसानंतर-रात्र, उन्हानंतर सावली त्याचप्रमाणे सुखामागे दु:ख असणारच ! या संकटाशी प्रत्येकालाच झुंज द्यावी लागते हे कवी जाणून आहे. म्हणूनच संकटांना घाबरून कवी आयुष्यातून माघार घेत नाही. उलट या संकटाशी संघर्ष करण्यास सिद्ध होतो.

''आकाश पेलताना घन दाटले तरीही
घेता कवेत त्यांना थकलो जरा न मी ही ।।''

('घन दाटलेल', घर दाटलेल, पृ.२)

'बांगड्यांची किनकिन' या कवितेमध्ये कवीने वाट्याला आलेले भयाण दारिद्रय आणि त्याच्याशी संघर्ष करणारे मन यांचे वर्णन केलेले आहे. पुरे आयुष्य दारिद्र्याच्या धुळीने माखले आहे. पण कवी हताश झालेला नाही. प्रसंगी आपले आयुष्य गहान ठेवून तो बायका मुलांच्या सुखाचे स्वप्न रंगवतो आहे. 'अंधार नावाच्या घरात' या कवितेतही प्रेताप्रमाणे जगावे लागणारे जीवन व त्याच्याशी संघर्ष करणारा व वास्तवात स्वप्न उराशी बाळगून जगू पहाणारा कवी याचे वर्णन आले आहे.

"आता –
मध्यरात्रीनंतर आयुष्याचं थडगं
उषाला घेऊन पहातोय स्वप्न
पहाटेचं
सकाळचं.... आणि
दुपारचं !!"

('अंधार नावाच्या घरात', घन दाटलेले, पृ. ४०)

ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेतून विविध जीवनविषयक जाणिवा प्रकट झाल्या आहेत. मानवी जीवनाचे सखोल चिंतन त्यांच्या कवितेत आहे. जीवनाची नश्वरता, अर्थहीन जीवन, जीवनातील संघर्ष त्यांनी वास्तवपूर्ण रेखाटला आहे. कवीच्या वैयक्तिक जीवनाचा किंवा जाणिवांचा अंतर्भाव काही कवितातून झाला आहे. तो वेगवेगळ्या भूमिकेतून व अनुभवातून. या आत्मपरकवितांनी कवीच्या जीवनावर प्रकाश टाकला आहे. कोळींच्या जीवन-जाणिवा प्रखर असल्यामुळे त्या जाणिवांचा काव्यातून होणारा अविष्कार प्रभावी ठरला आहे.

## ४) ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेतील सामाजिक जाणिवा स्वरूप:

ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेत सामाजिक कविता संख्येने अधिक आहेत. ते ज्या समाजात वाढले, समाजातले जे अनुभव त्यांना आले, त्याचे वास्तव चित्रण त्यांच्या काव्यात आले आहे. त्यांच्या सामाजिक कवितेत विविधता आहे, व्यापकता व व्यामिश्रता आहे. जीवनातील रूढी–परंपरा, सामाजिक बदल, नातेसंबंध, दारिद्र्य, महागाई, स्त्री–जीवन, दुष्काळ–महापुरासारखी संकटे, समाजातील विषमता, मानवतेची विटंबना, नैतिक मूल्यांचा ऱ्हास, स्वातंत्र्यानंतरची विफलता, मजुरांचे उद्ध्वस्त जीवन, यंत्रयुगाचे परिणाम, जीवन जगताना करावा लागणारा संघर्ष असे विविधांगी आशयविश्व त्यांच्या कवितांतून आविष्कृत झालेले दिसून येते.

### मानवतेची विटंबना :

समाजातील संपत चाललेल्या माणुसकीचे चित्रण कोळी यांनी आपल्या कवितेतून केले आहे. समाजाची भौतिक प्रगती होत आहे, माणुस साधनसंपत्तीने संपन्न होत आहे. मात्र सुख–समाधानापासून दुरावत आहे. त्याची आत्मिक स्थिती ढासळत आहे. नैतिकता खालावत आहे. परिणामी मानवतेची विटंबना सुरू आहे. याचे चित्रण ज्ञानेश्वर कोळींच्या अनेक कवितांतून येताना दिसते.

> ''आता माणुसकीत
> पैसाच एक माध्यम आहे
> माणसानेच माणूसकी
> आज विकली आहे
> जो तो टेरिकॉटमधून वरून फक्त चमकत आहे !
> माणसा –
> तू निर्मिलेल्या जगाचा प्रलयकाळ जवळ आहे !''

असा इशारा ते देतात. एकेकाळी या जगात मानवता नांदत होती. मानवांच्या राज्यात तिला पूजले जात होते, पण आज मात्र तिच मानवता दिसेनासी झाली आहे. घर वरून भक्कम दिसावे परंतु आतून सर्व तुळई किडलेली असावी तशीच अवस्था समाजातील मानवतेची झालेली आहे असे कवीला वाटते. समाजात हे चित्र का निर्माण झाले ? याचा विचार कवी आपल्या कवितेत करतो आहे.

''ही मानवता होती दैवत या जगाचे
स्मृतिची आज त्यांच्या पाने सडून गेली
हे राष्ट्र मानवांचे हे स्वातंत्र्य मानवांचे
मानवता तरी हो तडफडून का गेली ?''

('मानवता', जगणे माझे, पृ.११)

समाजात सर्वत्र स्वार्थ बोकाळला आहे. नातेसंबंधही स्वार्थापुरतेच उरले आहेत. कुणीही कुणाचे नाही अशी अवस्था आहे. प्रत्येकाचे बोलणे वेगळे आणि कृती वेगळीच आहे. माणसा-माणसात प्रेम उरले नाही, शेजारधर्मात दिलासा राहीला नाही. घराला घरपण राहिले नाही. हे सर्व पाहून कवीच्या मनाला दु:ख होते आहे. हे सर्व कसे झाले ? माणुसकी का नष्ट झाली ? असा प्रश्न त्याच्या मनाला पडतो आहे.

''जुनं ते सोनं गेलं
नव्याचा जन्म झाला
आई म्हणते लेक झाला
भाऊ म्हणतो वैरी झाला
अंगणातच लुच्चेगिरी घरपण संपत आहे
शेजार धर्म उरला नाही
काळ रोज बदलत आहे
माणूस म्हणून जगायला
अजून थोडा वेळ आहे

ऐक रे भल्या माणसा हीच माझी नाळ आहे ।।
आसं कसं इपरीत झालं एक म्हातारा ओरडत आहे ।।"

('आसं कसं झालं', आकाश पेलताना, पृ.३१)

समाजातील हुंडाबळी, भूकबळी सारख्या घटना कवीने मन सुन्न करतात. माणसाने अनेक नवनवे शोध लावले. परंतु माणुसकी टिकवण्यासाठी प्रयत्न मात्र केलाच नाही. अणुबॉम्ब सारख्या अस्त्रांचा शोध लावला परंतु त्याचा वापर माणसाच्याच विद्ध्वंसासाठी केला हे पाहून कवीला वाईट वाटते. म्हणूनच आता नवीन अणुबॉम्ब तयार केला तर तो माणसासाठी वापरावा पण माणुसकीसाठी वापरू नये असा सल्ला कवी देतो.

"पण.... बाळ.....
तो अणुबॉम्ब फक्त माणसासाठीच वापर
माणुसकीसाठी वापरू नको
आईन स्टाईनच्या डोळ्यात
हिरोशिमा–नागासकीचा
काळा ठिपका तरळू लागला आणि .... मी...
अणुबॉम्ब उराशी कवटाळून
माणसांची यादी करू लागलो !!"

('अणुबॉम्ब', आयुष्याच्या वाटेवर, पृ.८)

### गरिबांच्या पाचविला पुजलेले दारिद्रय :

गरिबी आणि दारिद्रयाने पीडलेले आयुष्य कोळींच्या अनेक कवितेतून डोकावते. हे दारिद्रय जन्मापासूनच आहे. बालपणीही ते छळते आहे. दारिद्रयाने गांजलेले लोक वेगवेगळ्या जातीचे आहेत, पंथाचे आहेत. तळागाळातले आहेत, पालातले ओहत तसेच मध्यमवर्गीय म्हणून जगणारेही आहेत. गरिबी ही या सर्वांचीच समान समस्या आहे. पोटाची भूक भागवण्यासाठी या माणसांच्या आयुष्यात जीवघेणा

संघर्ष आहे. प्रत्येक दिवस पोट कसे भरावे ? ही चिंता घेऊनच येतो. मुलांपासून म्हाताऱ्यांपर्यंत दिवस उगवल्यापासून मावळेपर्यंत खटाटोप सुरू होतो.

> ''कचराकुंडी तुडूंब भरलेली
> नगरपालिकेची वाट पहात तेंव्हा
> मुलं
> दिवेलागणीला पालाकडे वळतात
> बेवारशी
> दिवसासारखे ।।''
>
> ('मुले', आकाश पेलताना, पृ.४२)

गरिबीमुळे नशिबी पिढीजात कष्ट येते अशा घरातला 'बा' उपातापाशी राबत राहतो. त्याच्या अंगावरचे मांस झडून जाते. वेळेला अन्न नाही म्हणून 'बा' पोरांना ऊस आणून चारतो खंबीरपणे दु:ख आणि दारिद्रयाशी लढत राहतो. आपल्या मुलांच्या पोटाची काळजी या घरातल्या कर्त्या माणसाला आहे. निम्मी रात्र झाल्यावर त्याच्या घरातील चूल पेटते. पण कष्टाने तो ढळत नाही. कुटुंबाच्या सुखासाठी आयुष्यभर झटणाऱ्या बापाच्या आयुष्याचे चित्रण कोळींनी आपल्या कवितेत केले आहे.

> ''उगवत्या सूर्यासंग
> 'बा' खांदणी करितो
> सारं रान उकरून
> धरणीला टेकीतो
> नसे चटणी–भाकर
> दुपारच्या जेवणाला
> शिळं तुकडं भिजवून
> खातो पोटाच्या आगीला''
>
> ('माझा बा', आयुष्याच्या वाटेवर, पृ.३९)

सतावणारे दारिद्र्य, छळणारी भूक आणि वास्तव जीवन यांचे उपरोधात्मक वर्णन कवीने 'सलाईन' या कवितेत केलेले आहे. चवदार बिस्किटे, गरम चहा, पंचपक्वानाचे जेवण मिळावे अशी कवीची अपेक्षा नाही, पण पोटाची भूक भागवणारी भाकरीतरी वेळेवर असावी ही किमान अपेक्षा आहे. भाकरीविना तडफडणारा जीव सलाईन लावून जगविण्याचा प्रयत्न केला जातो. पण जेव्हा शेवट होतो तेव्हा मात्र भूकबळीला पहाण्यास कैक भाकरी धावून येतात.

''सलाईनच्या वायरने
टिपलेले माझे डोळे
शोधत होते भाकरीला
गेले कित्येक दिवस
तरीही ना अंदाज ना ठिकाणा
अखेर रस्त्यावरचे
पाव बटर धावून आले
युगायुगांची शिदोरी घेऊन
आतड्यांनी जिभल्या चाटल्या
ऋणानुबंधाच्या ''

('सलाईना', घन दाटलेले, पृ. ४६)

याशिवाय 'डिचकी' (घन दाटलेले, पृ.३०) 'मातेरं' (आकश पेलताना, पृ. ४९), 'बांगड्यांची किनकिन' (आकाश पेलताना, पृ. ५२) अशा अनेक कवितेतून भीषण दारिद्र्याचे चित्रण कवीने केलेले आहे.

**भिकाऱ्यांचे दारिद्रय चित्रण :**

समाजातील भिकारी म्हणून जगणाऱ्या, भीक मागणाऱ्या माणसांची दैनीय अवस्था ज्ञानेश्वर कोळींनी अनेक कवितेतून मांडली आहे. परिस्थितीने होरपळलेले हे

लोक भिकारी म्हणून जगतात. त्यातील काहीजण शारीरिकदृष्ट्या अपंग असतात. म्हणून त्यांना नाविलाजाने भिकाऱ्याचे आयुष्य जगावे लागते. भैरवी आळवून येणाजाणाऱ्या माणसांना पैसे मागत अपंग भिकारी खुरडत जाणाऱ्या गाड्यावरून शहराच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत सर्व पेठात जातो. देवाच्या दारात पैसे मागत राहतो आणि एक दिवस नगरपालिकेच्या गाडीतून भिकारी, निराधार म्हणून स्मशानात पोहचविला जातो. भिकाऱ्याच्या या संपूर्ण आयुष्याचा प्रवास 'देवाच्या दारात' या कवितेत चित्रित केला आहे.

"शिळी-इटकी भाकरी
पदरात पडू लागली
रक्तवाहिन्या टवटवीत झाल्या
थोटक्या हाताला बळ आलं
तोंडाची हाडं बळकट झाली
चांगला भिकारी म्हणून
पेपरात छापून आलो
आणि......
देवाच्या दारातूनच
एकदिवस नगरपालिकेच्या
गाडीत बसून
मसनवाट्यात
निघून गेलो ।"

('देवाच्या दारात',आयुष्याच्या वाटेवर, पृ. २८)

भिकारी म्हणून जगणाऱ्या या लोकांना समाजात ना किंमत ना मान । परंतु साधी सहानुभूतीही मिळत नाही. त्यांच्या जीवनाची, जगण्याची गरज फक्त त्यांनाच ! समाजात प्रतिष्ठित म्हणून जगणारी, श्रीमंत माणसे या माणसांचा उपहासच करतात.

पैसे मागणाऱ्या, दहा पैशासाठी हट्ट करणाऱ्या भिकाऱ्याचा त्यांना त्रास होतो. पैशाऐवजी एखादी इंग्रजी शिवी फेकून ही मंडळी निघून जातात. तरीही पुन्हा पुन्हा माणसांच्या रांगेला आशीर्वाद देत पैसे मागणाऱ्या भिकाऱ्याचे वास्तव दर्शन 'पटांगणात' कवितेतून घडते.

''मंदिराच्या पटांगणात बसून
ओरडतोय केकाटतोय
आशीर्वाद लागलं तुम्हा लेकरांना
एक दोन पैसे द्यावं धर्माला
आणि.....
नॉनसेन्स, लेझी, क्रेझी, काही नाही
पुढे व्हा, शब्द ऐकतो, पहातो, हसतो
दहा पैशासाठी हट्ट धरतो ''

('पटांगणात', आयुष्याच्या वाटेवर, पृ. २९)

काहीजणांच्या वाट्याला तर पिढ्यानुपिढ्या भीक मागण्याची वेळ येते. समाजातील प्रतिष्ठितांच्या दयेवर जगणाऱ्या या लोकांना अपमान सोशित जगावे लागते. काहीवेळा लोक भीक वाढतात परंतु अवहेलनाच जास्त पदरात पडते. जेव्हा भिक्षा न वाढता लोक दरवाजे बंद करतात तेव्हा 'भिकारी' म्हणून जगणाऱ्या माणसाच्या मनातील भावनांचा उद्रेक होतो. भिकारी म्हणून आपण लाचारपणे भाकरी मागतो याची जाणीव त्याला आहेच, पण आपणास दरवाजे बंद करणारे हे लोकही ऑफिसमध्ये, माणसात, रेशन दुकानात लाचारी पत्करतात, लाळ घोटेपणा करतात म्हणून वरून सभ्य दिसणाऱ्या लोकातील लाचारी दिसून येते.

''वाढायची असेल तर वाढा एक भाकरी
पाहिजे तर दरवाजे बंद करा
ज्ञानेश्वराला केले होते तसे पण....

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

उकिरडे पेटवू नका, गटारी बुजवू नका
कारण.... याच विभूतीवर
तुमच्या सारखे पांढरे,काळे, हिरवे, तांबळे
किडे वळवळतात, लाळ घोटतात
ऑफिसात ! माणसात !! रेशन दुकानात !!!''

('भीक',आयुष्याच्या वाटेवर, पृ. ३१)

**स्वार्थी पुढाऱ्यांचे चित्रण/भ्रष्ट राजकारण :**

लोकशाहीतील लोक आपले प्रतिनिधी निवडून देतात. हे निवडून गेलेले नेते आपल्या हितासाठी राज्यकारभार करतील अशी सामान्य माणसांची अपेक्षा असते. त्यांचा जयजयकार, त्यांची स्तुती गोरगरीब जनता करीत असते. परंतु वास्तवात मात्र उलट घडते. निवडलेले प्रतिनिधी जनतेलाच लुबाडतात. भ्रष्टाचार करून स्वत:चा फायदा करून घेतात. त्यावेळी सामान्य जनतेस कसा पश्चाताप होतो याचे प्रतिकात्मक वर्णन 'गारोडी...' या कवितेत आले आहे. ज्याप्रमाणे सापांचा खेळ करणारा गारोडी सापांना सांभाळतो, खाऊ घालतो, पण हेच साप आपल्या विळख्याने गारोड्याला आवळतात, विष ओकतात तेव्हा आपणच सुरू केलेला खेळ त्या गारोड्याला संपवावा लागतो.

''जीव कासावीस होतो तडफडतो तेव्हा –
मी माझ्या सापांना शेवटच्या क्षणी
नामदार..... खासदार.... आमदार....
सभापती.....चेअरमन..... सरपंच....
पोलीस पाटील म्हणून
शेवटचीच हाक मारतो
आणि....
माझा वेळ मीच संपवतो !''

('गारोडी', आयुष्याच्या वाटेवर, पृ.११)

निवडणुका जवळ आल्या की नेते आश्वासने देतात. परंतु या आश्वासनांची पूर्ती मात्र होत नाही. गरीब जनता बेरोजगारी, महागाई, दुष्काळ दारिद्रय अशा संकटात होरपळत असते. या जनतेला सर्व संकटातून बाहेर काढण्याची आशा केवळ मते देण्यापुरतीच दाखवली जाते. पण एकदा निवडून आले की पुढारी नंतर मात्र आपला शब्द पाळत नाहीत हेच समाजातील वास्तव आणि राजकारणातील अंधाधुंदी 'पुढं काय करायचं ते बघुया !' या कवितेतून व्यक्त होते.

"मत द्या – मत द्या
आण्णासाब निवडून आलंच पायजे
डबल रोजगार, पोरास्नी नोकऱ्या
गोरगरिबास्नी कापडं मिळणार
पन.. त्योबी म्हणतुया
मला आदी निवडून तर द्या
मग पुढंकाय करायचं त्ये बघू या !"

('पुढंकाय करायचं ते बघुया !' जगणं माझं, पृ. २०)

किंवा –

"पुन्हा मिरवणुका निघतात रस्त्यारस्त्यावर
कवी लेखक पत्रकार
घोषणा देतात पराजयाच्या
आणि ते ऐकतात
फक्त कोरे कागद
वर्षानुवर्षे ।।"

('मिरवणूक', आकाश पेलताना, पृ. ४८)

राजकारणातील ही घसरगुंडी पाहून कवीचे मन चिडते. आपण ज्यांना मान देतो, ज्यांच्यापुढे नम्र होतो ते पुढारी प्रतिष्ठेने मिरवतात. पण प्रत्यक्षात त्यांची तेवढी

योग्यता असते काय ? आदरणीय, माननीय आपण ज्यांना म्हणतो हे लोक प्रत्यक्षात मात्र फसवे असतात. त्यांची आपापसात लॉबी असते. हे लोक आपले चेहरे बदलत राहतात. आळीपाळीने पदे उपभोगतात पण सामान्य जनता मात्र सर्वांकडूनच पिळली जाते. राजकारणातील लोकांची ही लुबाडण्याची वृत्ती थांबवण्यासाठी आता जनतेनेही संघटना करावी, फसवणूक करणाऱ्या पुढाऱ्यांना तशीच अद्दल घडवावी असे कवीला वाटते. पुढाऱ्यांचे खोटेपण जनतेपुढे यायला हवे हा विचार 'संघटना' कवितेत मांडलेला आहे.

> ''कळपाच्या पुंजक्यात राहणारे
> कधी दात बदलतात तर कधी चष्मे बदलतात
> कलप तर रोजच करतात मान्यवर
> आदरणीय होतात आलटून पालटून
> आता आपणही संघटना स्थापन करू
> चष्मे
> दात
> कलप
> करण्यासाठी'
>
> ('आकाश पेलताना', पृ. ५०)

'आमची गाय' (आकाश पेलताना, पृ. ५७) या कवितेतूनही स्वातंत्र्यानंतरची विफलता स्पष्ट होते. राजकारणात जरी फोलपणा असला, भ्रष्टाचार असला तरी एक दिवस हे वास्तव बदलेल, लालक्रांती होईल आणि लोकशाहीचा खराखुरा विजय होईल हा आशावाद कवीला वाटतो. खाकी, खादीवाले नवनवे डाव रचतात, लोकांना लुबाडतात ही आजची स्थिती आहे. पण एक ना एक दिवस लोक बंड करून उठतील. ज्यांच्या आयुष्यातील हिरवळ हिसकावून घेऊन आयुष्य वठवले गेले ते लोक या भ्रष्ट अधिकाऱ्याविरूद्ध क्रांती करतील. ही लालक्रांती असेल. त्यासाठी

रक्ताची किंमत द्यायलाही शोषित वर्ग तयार असेल. अशावेळी क्रांती होऊन भ्रष्टांचे राज्य नष्ट होईल आणि खऱ्या अर्थाने लोकशाही जिवंत होईल अशी आशा कवीला वाटते.

''दळिंद्रीच्या जातीसाठी
लालक्रांती स्वप्नात आली
लालक्रांतीच्या प्रकाशाने
लोकशाही जिवंत झाली''

('लालक्रांती', आकशा पेलताना, पृ.२८)

**समाजातील विषमतेचे चित्रण :**

समाजातील आर्थिक विषमतेचे दर्शन ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेतून घडते. समाजातील भिन्नस्तर त्यांच्यातील तफावत, गरीब-श्रीमंतीची दरी, एकीकडे संपन्नता तर दुसरीकडील दारिद्रय याचे वास्तव चित्रण त्यांच्या कवितेत येते. विषमतेचे दर्शन घडवत असतानाच प्रतिष्ठित म्हणून मिरवणाऱ्या लोकांची खालावत गेलेली नैतिकता, संपत चाललेली माणुसकी याचेही वर्णन त्यांनी केलेले आहे. समाजातील एका घटकाकडून दुसऱ्या घटकाचे शोषण होण्यास आर्थिक स्थिती, अधिकार व स्वार्थी प्रवृत्ती कारणीभूत असल्याचे दिसून येते.

''लाखात संपत्ती ज्यांची पिढ्यांना पोसणारी
झोपडीमध्ये कुणाच्या अब्रुच राहिली नाही ।
बंगल्याच्या भोवती बागा कशा फुलारल्या
रानात बाभळीला पालाच राहिला नाही !''

('माणूस', जगणे माझे, पृ. २)

समाजातील विषम संस्कृतीची कवीला चीड येते. देवाच्या, धर्माच्या नावाखाली सुखात जगणारे, लाखो हजारो रूपये कमावणारे लोक पिढ्यानपिढ्या

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

सुखात जगतात. ते व्यासपीठावरून तत्त्वज्ञान सांगतात, दगडावर अभिषेक घालतात. देवाच्या नावावर गर्भश्रीमंत होतात. याच्या उलट ज्यांना नेसायला लुगडी मिळत नाहीत अशा स्त्रिया, उघडी-वाघडी पोरे, जी चिरडतात, भरडतात टाहो फेडतात. ही गरीब माणसे भंगलेली, फाटलेली आहेत. ती देवाची पूजा करतात. प्रसंगी उपाशी राहून देवधर्मासाठी खर्च करतात हे सर्व पाहून कवीला वाटते देव आणि धर्माशी या लोकांचे नेमके कसले नाते आहे ?

'देव आणि धर्म
धर्म आणि माणूस मांजर आणि उंदरंही
कोणत्या ऋणानुबंधाची नाती की,
गेली हजारो वर्षे छळत आहेत
छळणार आहेत ?'

('संस्कृती', आयुष्याच्या वाटेवर, पृ.३०)

समाजातील श्रीमंत लोक मजेत जगतात. तर गरीब पोटासाठी संघर्ष करीत असतात. एकीकडे आनंदाचा पूर असतो तर दुसरीकडे पोटात भूकेचा सूर असतो. सण-उत्सवाला दोन्ही स्तरात भिन्न वातावरण असते. 'दिवाळी'सारखा सण असेल तर सुखवस्तू घरात आनंदाला उधाण येते. तर गरीबाला मात्र उद्या झोळी भरेल का ? ही चिंता ग्रासत असते. हीच विषमता अगदी नेमकेपणाने कवीने शब्दबद्ध केलेली आहे.

''कुठे करंजीचा वास
कुठे बासुंदीचा वास
चतकोर तुकड्याला
पोरं उघडी उदास''

('दिवाळी', जगणे माझे, पृ. २३)

**स्त्री जीवनाचे चित्रण :**

ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेतील स्त्री-जीवन सर्व थरातील आहे. मुरळी म्हणून उपेक्षित जीवन जगणारी स्त्री, लमाण्याच्या जातीतील ऊसतोडीची कामे करणारी स्त्री, घरधन्याने आणून दिलेल्या धान्य-मालातून काटकसरीने संसार चालवणारी स्त्री, भाऊबीजेला भावाने यावे म्हणून त्याची प्रतीक्षा करणारी स्त्री, आई बनून घरासाठी राब-राब राबणारी स्त्री आणि आधुनिक युगाबरोबर सुधारित म्हणून घेणारी व नवऱ्याला कामे सांगून नोकरी करणारी स्त्री अशी स्त्री जीवनाची अनेक रूपे पहावयास मिळतात. या स्त्री जीवनात वास्तवता आहे. समाजाने, रूढीने तिच्यावर लादलेल्या बंधनाची कवीला मनस्वी चीड आहे.

मुरळी म्हणून जीवन जगणारी स्त्री वंचित असते. उपेक्षित असते. ती एक स्त्री म्हणूनच जन्म घेते, पण समाज तिला मुरळी बनवतो. मुक्या देवाच्या नावाखाली समाजातील लोक तिला वासनेच्या जाळात लोटतात. नाव खंडोबाचं आणि मालकी या वासनेनं बरबटलेल्या लोकांची असा हा न्याय असतो. त्या स्त्रीचीही काही तरी स्वप्ने असतील तिलाही तिच्या मनाप्रमाणे जगण्याचा अधिकार आहे याचा विचार समाज करीत नाही ही खंत कोळींच्या कवितेत व्यक्त होते.

''कुणीतरी सौभाग्याचा टिळा लावावा
लालशा टिळ्याबरोबरच
माझाही संसार फुलला असता
पण....
हे सारंच वाया गेलं रे
आसं सपान नशिबी कवा आलंच न्हाय
सपान वाऱ्यावरच ऱ्हायलं ''

('मी धन्य झाले', जगणे माझे, पृ. १२)

आपण जगणार कसे ? यापेक्षामरणानंतर आपले नेमके काय होईल ? याचा विचार ही स्त्री करते. आपल्यासाठी कोण रडणार ? अंत्यविधी कोण करणार ? आपल्या मुलीचे काय होईल ? तिचा बाप कोण हेही या स्त्रीला सांगता येत नाही. आपल्या पाठीमागे मुलीलाही खंडोबाच्या नावानं भंडारा उधळीत जगावे लागेल का ? याची काळजी ही स्त्री करते. आणि शेवटी खंबीरपणे आपल्या वाट्याला जे आले ते आपल्या मुलीच्या नशिबी येऊ नये म्हणून झटत राहते.

'ऐक पोरी सांगते तुला' या कवितेतून रूढी-समाजाच्या जाचक प्रथेविरूद्ध बंड करणारी आणि आपल्या पोरीला समजावणारी स्त्री पहावयास मिळते. आजपर्यंत ही स्त्री स्वत: मुरळी म्हणून जगली. खंडोबाच्या नावावर जोगवा मागत फिरली. अनेकजणांचे अत्याचार पचवत तिचं आयुष्य नासून गेलं आहे. पण हे सर्व मुलीच्या वाट्याला येऊ नये, तिने उदं उदं म्हणू नये म्हणून तिची तळमळ आहे.

> ''परडी, जग, पोत, माळ
> याचा इस्कुट करायचा हाय
> आसंल-नसंल तेवढा भंडारा
> गटारीत टाकायचा हाय
> हातातली घाटं तोडून मोडून कूस तुझीउजवायची हाय
> ऐक पोरी सांगते तुला उदं-उदं म्हणायचं न्हाय ''

('ऐक पोरी सांगते तुला', आयुष्याच्या वाटेवर, पृ. ३२)

ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेतील स्त्री नातेसंबंध जोपासणारी आहे. ती दारिद्रयात जगते आहे परंतु दारिद्रयाची तक्रार करीत जगत नाही. भाऊ, नवरा, मुले यांना ती समजून घेते. कुटुंबाच्या सुखासाठी स्वत: आयुष्यभर झटत राहते. बाळ आजारी असताना त्याला वाचवण्यासाठी तिचा जीव कासावीस होतो.

'माझ्या बाळाला वाचवा' (आकाश पेलताना, पृ.२), 'भाऊराया' (आकाश पेलताना, पृ.३), 'धनी माझा ग बाई' (आकश पेलताना, पृ.१५), 'बांगड्यांची किनकिन' (आकाश पेलताना, पृ.५२), 'आई' (आकाश पेलताना, पृ.५३), 'नाही सासर वनात' (घन दाटलेले, पृ.२२), 'चिमणी' (घन दाटलेले, पृ,२३) अशा अनेक कवितेतून स्त्रीजीवनाच्या नातेसंबंधाच्या छटा व्यक्त झाल्या आहेत. ही स्त्री स्वत:पेक्षा इतरांचा विचार करणारी आहे. ती स्वार्थी नाही, स्वत:चे जीवन तिने कुटुंबासाठी समर्पित केलेले आहे. तिच्या मनामध्ये सर्वांप्रति माया आहे.

> ''भाऊबीज झाल्यावर
> मासाकाटा मी आणीन
> माझ्या बंधू ग रायाला
> भातमासा मी चारीन् ''

('भाऊराया',आकाश पेलताना, पृ.३)

किंवा -

> ''तुझ्या आवडीचे सारे
> सारे करून ठेवले ।
> पीठ ज्वारीचे मळता
> मीच भाकरी जाहले ।।''

('मीच भाकरी जाहले', घन दाटलेले, पृ. १८)

स्त्री मुक्ती चळवळीमुळे स्त्री-जीवनात आमुलाग्र बदल झाला. चूल-मुल सांभाळणारी स्त्री उंबरठ्याच्या बाहेर पडली. मार्केट चावडी, ड्यूटीतील कर्तव्ये सांभाळू लागली. आपल्या स्वातंत्र्याची जाणीव तिला झाली. घरातील स्वयंपाक, पाणी भरणे, भांडी घासणे, दूध तापवणे, भाजी निवडणे, भाकरी करणे, झाडलोट, आवरा आवर, मुलांना आंघोळ घालणे, मुलींची वेणी घालणे, साऱ्यांना जेवण वाढणे ही परंपरागत कामे आता तिने झुगारली आणि आपल्या नवऱ्याला ती हुकूम सोडू

लागली. असे बदलल्या स्त्रीचे विनोदपूर्ण वर्णन कवी 'तुझं काम चालू कर !' या कवितेत करतात,

"दिवस उगवून वर आला
रेड्यावानी झोपू नगस
शेणघाण सारी काढून
मिसरी लावत बसू नगस
मी जरा चावडीत जाते, चहा तेवढा लवकर कर !
आमची मुक्ती आली आहे तुझं काम चालू कर."

('चुझं काम चालू कर', आयुष्याच्या वाटेवर, पृ.१७)

मानवतेची विटंबना, दारिद्र्य, विषमता, स्त्री-जीवन, भ्रष्ट राजकारण, संपणारी माणुसकी याशिवाय वाढत्या महागाईवरही 'कोळीं'च्या कवितेने प्रकाश टाकला आहे. 'भाऊबीज' (जगणे माई, पृ.२८), 'मातेरं सुद्धा महाग आहे' (घन दाटलेले,पृ.१४) या कवितेतून वाढत्या महागाई विषयी त्यांचे विचार स्पष्ट होतात. बदलते मानवी जीवन व जीवनमूल्यांचा होणारा ऱ्हास याविषयीही कवी चिंता व्यक्त करताना दिसतो. ज्ञानेश्वर कोळींच्या सामाजिक कवितेत विषयांची विविधता आहे. कवितेतील सामाजिक जाणीव व्यापक स्वरूपाची आहे. समाजातील अनेक समस्या, अडचणी, रूढी-परंपरा याचे वास्तवपूर्ण वर्णन त्यांच्या कवितेत आले आहे. कोळींच्या कवितेतील सामाजिकता ही त्यांच्या काव्यलेखनाच्या प्रारंभापासूनच आहे. राजकीय, सामाजिक परिस्थितीचा परिणाम त्यांच्या संवेदनशील मनावर होत होता. त्यातूनच त्यांची समाज वास्तव मांडणारी कविता निर्माण झाली.

### ५) ज्ञानेश्वर कोळी यांच्या प्रेमभावनेचे चित्रण:

ज्ञानेश्वर कोळींच्या कविता जास्त प्रमाणात सामाजिक विषयाने भारलेल्या आहेत. असे असले तरी त्यांना 'प्रीती' ह्या विषयांचे वावडे नाही. प्रीतीचे हळवे सूर

त्यांच्या कवितेत उत्कटपणे व्यक्त होताना दिसतात. मानवी मनातील भावभावना विरहाने व्याकूळ झालेली मने, प्रेमभंगाची दु:खद जाणीव व्यक्त करणाऱ्या कविता अशा विविध प्रेमानुभव व्यक्त करणाऱ्या कविता त्यांनी लिहिल्या आहेत. प्रियकर प्रेयसीच्या सहवासातील हळूवार प्रेमभावनेचे नाजूक धागेही त्यांच्या कवितेत पहावयास मिळतात.

'ना राजा ना राणी', 'सांग साजणे', 'मऊशार गवतात', 'धनी माझा ग बाई', 'दुपारच्या गं पाऱ्याला', 'मीच भाकरी जाहले' या कवितेतून प्रेमभावना व्यक्त झाल्या आहेत. प्रेयसीच्या भेटीने कवितेतील प्रियकराला युगायुगाचे सौख्य भेटल्याचा आनंद होतो. तिच्या येण्याने सर्व दिशा सुगंधी झाल्याचा भास त्याला होतो. 'सांग साजणे' कवितेत कवी लिहितात,

> ''आज साजणी ऊन कोवळे गुपित तुझे सांग ग
> तुझ्यासवे हा स्वप्नपक्षी मनात माझ्या झुलतो ग
> वाऱ्याच्या लाटा थंडीचा काटा केस भुरूभुरू उडती ग
> पाऊस घुमला कणाकणातुन दिशा सुगंधी झाल्या ग ''
>
> ('सांग साजणे', जगणे माझे, पृ. ४०)

किंवा –

> ''किती कोमल नाजूक
> दारातली तू कर्दळ
> परसात प्रिये तुझा
> धुंद मोगरा निर्मळ ''
>
> ('मऊशार गवतात', आयुष्याच्या वाटेवर, पृ. १५)

प्रस्तुत कवितेत प्रियसीची नाजुक काया प्रियकराला दारातील कर्दळ वाटते. घराच्या परिसरात तिच्या मोकळ्या केसांचा गंध पसरला आहे असा भास त्याला

होतो. जरी घरात श्रीमंती नसली, घर छप्पराचे असले तरी प्रेमाची रेशमी ऊब असल्याची खात्री प्रियकर देतो आहे.

भर दुपारी उन्हाने अंगाची लाही-लाही होते आहे. प्रेयसीच्या गोऱ्या गालावर घामाचे थेंब जमा होत आहेत. वाऱ्याची मंद झुळूक तिच्या अंगाला चाटून जाते आहे. आपल्या टिचभर रूमालाने ती घाम पुसण्याचा प्रयत्न करीत आहे. तिचा बांधा प्रियकराला शेवग्याच्या शेंगेसारखा सडसडीत वाटतो. पाय फुलासारखे नाजुक वाटतात. उन्हामुळे त्रास होईल म्हणून जणू तिच्याचसाठी गुलाबी वारे सुटते आहे असे मोहक वर्णन कवी 'दुपारच्या ग पाऱ्याला' (आकाश पेलताना, पृ.२०) या कवितेत करतात.

ज्ञानेश्वर कोळींची प्रेमकविता केवळ प्रियकर-प्रेयसी यांच्यापुरती मर्यादित मात्र नाही. आपल्या पत्नीवर प्रेम करणारा पती आणि पतीच्या सुखासाठी सर्वस्व अर्पण करणारी पत्नी यांच्या प्रेमभावनाही कवीने साकारलेल्या आहेत. त्यादृष्टीने 'धनी माझा ग बाई' आणि 'मीच भाकरी जाहले' या कविता महत्त्वपूर्ण वाटतात.

> ''दिस दमून भागून
> जसा रातीत शिरतो
> माझ्या धन्याच्या कुशीत
> जीव सुखाने नांदतो ''
>
> ('धनी माझा गं बाई', आकाश पेलताना, पृ. १५)

किंवा

> ''आणि वाटले मनाला
> माझा साजण येणार ।
> तिन्हीसांजच्या येळंला
> आवरले घरदार ।।''
>
> ('मीच भाकरी जाहले', घन दाटलेले, पृ. १८)

संसारामध्ये तृप्त असणारी, पतीवर जिवापाड प्रेम करणारी, पतीच्या आवडीचा सारा स्वयंपाक करून वाट पाहणारी पत्नी कवी रंगवितात. आपला पती संसारासाठी राबातो, कष्ट करतो याची जाणीव तिला आहे. पतीच्या नावाचे कुंकू ती अतिशय निष्ठेने भांगात भरते आहे. ज्वारीचे पीठ मळता मळता स्वत:च भाकरी होऊन जाते आहे. तिन्हीसांज होताच उंबरठ्यात पतीची वाट पहात थांबणारी ही स्त्री आपली प्रेमभावना मांडते आहे असे आकर्षक वर्णन कवी करतात.

**प्रेमिकांच्या विरहावस्थेचे चित्रण :**

जोडीदाराच्या विरहाने व्याकूळ होणाऱ्या प्रेमिकांचे चित्रण कवीने उत्कट शब्दात रंगविलेले आहे. 'आवाज' ('जगणे माझे', पृ. १७), 'सखे' (आयुष्याच्या वाटेवर, पृ. ४३), 'सावली' (आकाश पेलताना,पृ.२३), 'तुझा पदर', (आकाश पेलताना, पृ.६०), 'फुंकर' (घन दाटलेले, पृ. १२) या सर्व कविता विरहाच्या अवस्थेचे वर्णन करणाऱ्या आहेत.

प्रेयसीच्या पैजंणाचा आवाज ऐकण्यासाठी आतूर झालेल्या प्रियकराची अवस्था 'आवाज' कवितेत रेखाटली आहे. प्रेयसीच्या आठवणींनी प्रियकराच्या मनात हुंदका दाटला आहे. प्रेयसीच्या पावलाचा शोध घेत प्रियकर खूप फिरला, प्रेयसी भेटेल, दिसेल म्हणून शोधत राहिला. परंतु ती दिसली नाही तेव्हा तो हताश झाला आहे.

प्रेयसीपासून दूर राहणारा प्रियकर तिच्या आठवणीचे वर्णन करताना, 'सखे....!' या कवितेत म्हणतो,

> ''सय झाली सखे तुझी
> जशा सागराच्या लाटा
> दाट धुक्यात विरून

वेड्या झाल्या पायवाटा ।''

('सखे...!', आयुष्याच्या वाटेवर, पृ. ४३)

किंवा

''डोंगराच्या पायथ्याला

तुझी सावली हालते

किती चालून दमलो

रात डोळ्यात सलते.''

('सोवली', आकाश पेलताना, पृ.२३)

'फुंकर' कवितेतील प्रेयसी प्रियकराला सोनसळी प्रमाणे भेटते. आयुष्याचे सुरेल गाणे प्रियकराबरोबर गाते आणि एक दिवस त्याच्यापासून दूर निघून जाते. क्षणभराच्या या भासाने कवीच्या उभ्या आयुष्याला आठवणींचा फास लागतो. तिच्या मनाला तिच्या आठवणींनी जखमा झाल्या आहेत. त्या प्रियकराने ऊरात अलगद जपल्या आहेत व प्रेयसीला या जखमांवर थोडीशी फुंकर घालण्याची विनंती तो करत आहे.

**प्रेमभंगाचे दु:ख व्यक्त करणाऱ्या कविता:**

प्रेयसीच्या दूर जाण्यामुळे झालेल्या दु:खाचे वर्णन कवीने काही कवितेतून केले आहे. स्वप्न भंगल्यामुळे जीवनात येणारी निराशा, निरसता याचेही वर्णन केलेले आहे. 'ना राजा ना राणी' (जगणे माझे, पृ.५), 'का असे' (जगणे माझे, पृ.३०), 'आभाळभर पक्षी' (घन दाटलेले, पृ.४२), 'आठवांचा घाट' (आकाश पेलताना, पृ.१४), 'आभाळाच्या खाली' (आकाश पेलताना, पृ. १७) या कवितेतून प्रेमभंगाचे दु:ख व्यक्त झालेले आहे.

आपल्या जाती-पातीचा नसणाऱ्या प्रियकरासाठी प्रेयसी आपला जीव ओतते. त्याच्यावर जिवापाड प्रेम करते. परंतु भातुकलीच्या खेळाप्रमाणे त्यांची कहाणी

वाऱ्यावर विरून जाते याचेच वर्णन 'ना राजा ना राणी' (जगणे माझे, पृ.५) या कवितेत कवीने केलेले आहे.

आपली प्रेयसी दूर गावी गेल्याने व्याकूळ झालेल्या प्रियकराचे वर्णन 'आभाळाच्या खाली' कवितेत आलेले आहे. प्रेयसीसाठी प्रियकराने गाणी गाईली, तिच्याच पावलांची धून त्याच्या काळजात वाजते आहे, पण आज मात्र तिच्या विना तो आनवाणी झाला आहे. उन्हाळा, हिवाळा, पाऊस सर्व ऋतू त्याला निरस वाटत आहेत कारण त्याच्या स्मृतीची फुलेच करपून गेलेली आहेत.

प्रेयसी विना प्रियकराचे प्राण अडखळत आहे. तिच्या आठवणींनी त्याचे नेत्र भरून येत आहेत. जणू जगणेच अशक्य झाले आहे ही भावना 'आठवांचा घाट' कवितेत व्यक्त होते.

''शपथांच्या आणाभा
घेऊनी फिरलो
जगण्यात तूच माझ्या
आणिक जगलो
आंगणात आज माझ्या सरणाचा थाट
आठवांचे तुझ्या राणी बांधले मी घाट ''

('आठवांचा घाट', आकाश पेलताना, पृ. १४)

किंवा

''आठवांच्या भैरवीने मी असा घायाळ झालो
दे सुखा चितेवरी तू मागणे माझेच झाले ।।''

अशाप्रकारे ज्ञानेश्वर कोळींच्या प्रेमकवितेत विरहव्यवस्था, प्रेमभावना, व्याकुळता, प्रेमभंगाचे दु:ख व्यक्त करणाऱ्या कविता अशा अनेक प्रेमछटा पहावयास मिळते. कवीने श्रृंगारापेक्षा व स्त्रीच्या शरीरवर्णनापेक्षा मनातील प्रेमभावनेस महत्त्व

दिलेले आहे. त्यामुळे त्यांची प्रेमकविता कुठेही उथळ झालेली नाही. विरहभावनेच्या वर्णनातून वाचकाला एक प्रकारची हूरहूर लावून ठेवण्यात त्यांची कविता यशस्वी ठरली आहे.

### ६) ज्ञानेश्वर कोळीं यांची निसर्गविषयक कविता:

मराठीतील निसर्गकवितेला समृद्ध अशी परंपरा आहे. केशवसुत, बालकवी, भा.रा. तांबे, रविकिरण मंडळातील कवी बा.भ. बोरकर, कुसुमाग्रज, ना.ध. देशपांडे यांच्यापासून ते ना.धो. महानोर, इंद्रजित भालेरावापर्यंत निसर्गकवितेचा वारसा चालत आला आहे. या निसर्गकवितेच्या परंपरेत ज्ञानेश्वर कोळींची कविता स्वत:चे वेगळेपण जपणारी आहे.

ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेत निसर्गाची अनेक रूपे येतात. आषाढ-श्रावणात मनाला भुरळ घालणारा निसर्ग येतो तसाच मानवी जीवनाला छळणारा, त्रस्त करणारा निसर्गही येतो. आपल्या सौंदर्याने दिपवून टाकणारा निसर्ग येतो तसाच घर-दार, संसार उद्ध्वस्त करणारा निसर्गही येतो. सर्व ऋतूंचा उल्लेख, सकाळ-दुपार-सायंकाळच्या कळा, निसर्ग आणि मानव संबंध, निसर्गातील झाडे, वेली, पाने, फुले, नद्या, डोंगर, पक्षी, पाऊस यांच्या नानाविध रंगछटा कोळींच्या कवितेत अनुभवायला मिळतात.

'घन गर्जत गर्जत' या निसर्ग कवितेत कवी पावसामुळे सृष्टीत निर्माण होणाऱ्या अल्हादायक वातावरणाचे वर्णन करतात. घन गर्जत येतात जणू काही ते धरतीला भेटण्यासाठीच येत असतात अशी कल्पना करून पावसाच्या आगमनाने सुखावलेल्या धरतीचे चित्र ते रेखाटतात.

''घन गर्जत गर्जत
गंध वादळी सुटला

हळदीच्या पानोपानी

थेंब थेंब उतरला ।।

घन गर्जत गर्जत

पाणी सांडल सांडल

डोंगराच्या पायथ्याला

रान हिरवं झोपलं ।।''

('घरगर्जत गर्जत', आकाश पेलताना, पृ.४)

पावसाने तृप्त झालेले रान जणू डोंगराच्या पायथ्याला झोपी गेले आहे असे कवीला वाटते. पावसामुळे सगळीकडे आनंदाचे वातावरण निर्माण होते. बळीराजा तिफन घेऊन पेरणीला सज्ज होतो. पेरणी करत असतानाच हिरव्यागार शिवाराचं स्वप्न त्याच्या मनात फुलू लागतं. हीच भावना 'झन्नाट पाऊस' कवितेतूनही व्यक्त होते.

''झन्नाट पाऊस

उधळत आला

भिजल्या रानात

रंग सांडला ।।

उन्हाची तिरिप

दिस हसला

मातीच्या कुशीत

कोंब रूजला ।।''

('झन्नाट पाऊस', आकाश पेलताना, पृ. १३)

पडणाऱ्या पावसामुळे धरती ओली झाली आहे. या ओलाव्यामुळे धरतीच्या कुशीत पेरलेल्या बीयांना अंकुर येणार आहे. आजूबाजूला पावसाच्या पाण्यात बेडकांचे ओरडणे सुरू आहे ते कवीला जणू संगीत वाटते आहे. धरतीला सुखावणारा

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

हा पाऊस रंग उधळत आला आहे. या पावसाला 'झन्नाट' असे विशेषण लावून कवी त्याच्या आगमनाची तीव्रता व्यक्त करतात.

आषाढ-श्रावण महिन्यातील निसर्गसौंदर्यही कवीला मोहवून टाकते. आषाढ-श्रावणात पानाफुलांना बहर येतो, गार वाऱ्याचा स्पर्श सृष्टीला सुखावतो. रानातले पक्षी बागडू लागतात. मोर-लांडोर, चिऊ-काऊ, राघूमैना या महिन्याच्या आगमनाची खबर झाडांना देत असतात. चिंबचिंब भिजवणाऱ्या या आषाढ श्रावणाविषयी कवी लिहितात -

''माझा आषाढ श्रावण
अंग अंग शहारते
धुंदगंध धुमारून
स्वप्नगंध तरारते ।।''

('आषाढ-श्रावण',आकाश पेलताना, पृ. ८)

श्रावण महिन्यात पावसाच्या धारा झरू लागतात. थंड हवा सगळीकडे पसरते. पक्षी झाडावर आपल्या घरट्यात पानाआड दडून राहतात. रानेवने चिंब-चिंब भिजतात. सगळीकडे हिरवेगार दृष्य दिसू लागते. जणू काही श्रावणाचे वैभव सर्व पृथ्वीवर पसरलेले असते. श्रावणातला हा पावसाचा थेंबन थेंब कवीला सुखावतो. फांद्यावर पानावर चिकटलेल्या पाण्याच्या थेंबांना कवी चांदण्याची उपमा देतो.

''फांदी-फांदीवर थेंब
जणू चांदण्या बसल्या
डोंगराच्या पायथ्याला
घड्या शालूच्या पडल्या ''

('हिरवं सपान जपते', आकाश पेलताना, पृ.१९)

ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेतून येणारा हा निसर्ग सुखावणारा आहे. मनाला प्रसन्न करणारा आहे. परंतु अशा कवितांचे प्रमाण मर्यादित आहे. त्यांच्या जास्तीत जास्त निसर्गकविता निसर्गाच्या रौद्ररूपाचे वर्णन करणाऱ्या आढळतात.

'उन्हाळा', 'पाऊस', 'महापूर', 'पाऊस', 'कधी येणार पाऊस', 'आसमंत फुलवा रे', 'चूल आणि पाऊस' या सर्व कवितातून निसर्गाचे रौद्ररूप दिसून येते.

मानवाचे जीवन निसर्गावरच अवलंबून आहे. निसर्गाला माणूस आपला सखा मानतो. परंतु हा निसर्ग जेव्हा कोपतो तेव्हा मात्र मानवी जीवन उद्ध्वस्त होऊन जाते. कधी महापूर तर कधी दुष्काळ जगणे विस्कळीत करून टाकतो. या निसर्गाच्या रौद्ररूपाचा परिणाम केवळ मानवी जीवनावर होत नाही तर पशू-पक्षावरही होतो. नदी आटून जाते, रानातल्या बाभळीला पालासुद्धा रहात नाही. असा रखरखता उन्हाळा येतो तेव्हा काय अवस्था होते हे सांगताना कवी लिहितात -

''नदी आटली ग बाई
धग पिऊन पिऊन
गुरं ढोरं सैरावैरा
जीव मुठीत घेऊन ।।
आला आता ग उन्हाळा
दगडाची लाही लाही
वल्या बाळंतिणीला
चार दीस पाणी नाही ।।''

('उन्हाळा', जगणे माझे, पृ.९)

अशी बिकट अवस्था होते. वासरू खुंटीला पेंगू लागते, गाईचा पान्हा आटतो. उन्हाळ्यात ही अवस्था मग सर्वजण पावसाची वाट पाहू लागतात. रानाला भेगा पडतात. शेतकऱ्याचे काळीज आतल्या आत जळू लागते. गोठ्यात जनावरे

हंबरू लागतात. पाखरांना चारा मिळत नाही. पावसाची वाट पाहून खडकांनाही तडे जातात आणि रानात गुरांच्या हाडांचे सापळे पडू लागतात.

> ''खोल डोळ्यांच्या विहिरी
> गेल्या नद्यांच्या गावाला
> तापलेल्या वाळुतूनी
> तांडा गुरांचा चालला ''
>
> ('कधी येणार पाऊस',आकाश पेलताना, पृ. २६)

किंवा

> ''पाने फुले करपली
> पहा पहा रे ढगांनो
> काळ कठीण कठीण
> धावा धावा रे मेघांनो''
>
> ('आसमंत फुलवारे !', घन दाटलेले, पृ. १३)

पाऊस नसताना ही अवस्था होते पावसाला येण्यासाठी विनवावे लागते. परंतु हाच पाऊस जेव्हा बेभान होऊन कोसळतो तेव्हा पावसाचे येणे हेच संकट ठरते. शेतीसाठी पाऊस गरजेचा आहे. पावसाला सुरवात झाली की शेतकरी आनंदून जातो, पेरणीची घाई उडते पण पाऊस सतत कोसळत राहिला तर मात्र शेतकऱ्याच्या झोपडीत दारिद्र्याचा अंधार पसरतो. कोळींच्या अनेक कवितेत विनाशकारी पावसाचे वर्णन येते. आभाळ फाटल्यासारखा पाऊस धो-धो कोसळतो तेव्हा पाणी गावात शिरते. घरादारात घुसते आणि गोररीबांचा संसार वाहून जातो. महापूराचे हे संकट मानवी जीवनाला नष्ट करते. पाऊस एकसारखा पडत असल्यामुळे बाहेर मजुरी मिळत नाही. डब्यात मुठभर धान्य शिल्लक नाही चार-चार दिवस भाकरी मिळत नाही. लहान मुले भुकेनं व्याकुळ होतात. त्यांना चक्कर येते असे हृदयद्रावक वर्णन कवी करतो.

''उपाशीच पोटी
झोपी गेला बाळ
असा नकु काळ.... कुण्या जीवा ।।''

('चूल आणि पाऊस', घन दाटलेले,पृ. १९)

किंवा -

''आता कशाचा पाऊस
जाता बाहेर येईना
आणि अंधाऱ्या घरात
दिवा माझाच ऱ्हाईना ''

('पाऊस', जगणे माझे, पृ.१०)

सतत कोसळणारा पाऊस असे रौद्ररूप धारण करतो आणि मानवी जीवनाला तारणारा पाऊस मारक ठरतो. नद्यांना जेव्हा पूर येतो तेव्हा गावात आक्रोशाची धार वाहू लागते. पाखरांचा थवा निराधार होतो. गाव पाण्यात बुडून जातो व गावावर प्रलय कोसळतो. महापूराचे हे वर्णन कवी 'महापूर' या कवितेत करतात.

''नदी तुडुंब भरली
पाणी बेभान गावात
गुरढोरं भांडीकुंडी
गाढ झोपली पाण्यात''

('महापूर', आयुष्याच्या वाटेवर, पृ. १४)

अशाप्रकारे कोळींच्या कवितेतील निसर्ग ही दोन्ही रूपे घेऊन येतो. निसर्गाच्या आषाढ-श्रावणातील आल्हाददायक रूपाबरोबरच पूर-दुष्काळातील प्रलयंकारी रूपही अनुभवायला मिळते.

ज्ञानेश्वर कोळींचे निसर्गाशी, पावसाशी एक अतूट नाते जाणवते त्यांच्या कवितेचे वैशिष्ट्य म्हणजे कवी पावसाचे केवळ वर्णन करत नाही तर थेट पावसाशी

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

संवाद साधतो. दुष्काळाच्या काळात पावसाला येण्यासाठी विनंती करतो तर महापूराच्या काळात प्रलय थांबवण्यासाठी प्रार्थना करतो.

निसर्गाचे लावण्यमयी वर्णन करण्यात न रमता कवी सर्वसामान्य, गोरगरीब माणसाच्या दृष्टीने निसर्गाकडे पाहताना दिसतो. पाऊस आला याच्या आनंदाबरोबरच पावसामुळे काम बंद राहील. मग पोटाचे काय ? हा प्रश्न कवीच्या मनाला सलत राहतो. निसर्गाच्या माध्यमातून गोर-गरिबांच्या आयुष्याचे बकालपण कवी रेखाटतो. कवीने शब्दबद्ध केलेला निसर्ग केवळ सौंदर्यनिष्ठ नाही तर सर्वसामान्यांच्या दु:खाच्या वास्तवतेची किनार त्याला बेमालूमपणे जोडली गेलेली आहे असे म्हणावे लागेल.

## ७) समारोप :

ज्ञानेश्वर कोळी यांच्या कवितेत आशयाची विविधता आढळते. त्यामुळे त्यांच्या कवितांची आशयसूत्रे निश्चित करताना विविध गटात वर्गीकरण केले आहे. त्यांच्या सामाजिक कविता समाजातील चालीरीती, परंपरा, परिवर्तन, स्त्री-जीवन, वाढता चंगळवाद, नैतिक मूल्यांची घसरण अशा सर्वच गोष्टीवर कोळींची कविता प्रकाश टाकते.

मानवी जीवनातील अनेक घटना-प्रसंग, सुख-दु:खे, अनुभव त्यांच्या कवितेतून व्यक्त झालेले आहेत. मानवी जीवनाचे त्यांनी केलेले चित्रण हे अधिक सजीव झालेले आहे.

काव्यविषयक कवितेतून कवीची कवितेविषयी असणारी धारणा स्पष्ट झाली आहे. कोळींची कविता त्यांच्या जगण्यातील अनुभवातून स्फुरलेली आहे. त्यामुळे ती अधिक जिवंत व सरस ठरते.

निसर्गाची विविध रूपे कोळींच्या कवितेतून व्यक्त होतात. मनाला सुखावणाऱ्या निसर्गापेक्षा मानवी जीवनाला भेडसावणारा रौद्ररूपी निसर्गच मोठ्या प्रमाणात कवितेतून चित्रित होतो.

कोळींच्या प्रेम कवितेतून अनेक प्रेमछटा व्यक्त होतात. त्यांची प्रेमकविता श्रृंगारिकतेचे वर्णन करताना कुठेही उथळ झालेली नसून संयमी असल्याचे जाणवते. मात्र सामाजिक व जीवनविषयक कवितांच्या मानाने प्रेमकविता तितकी सरस किंवा प्रभावी वाटत नाही.

थोडक्यात आपल्या भावभावना वाचकाच्या हृदयापर्यंत पोहचविण्यात कवी यशस्वी ठरलेले आहेत. त्यांच्या कवितेत विविधतेबरोबरच व्यापकता व सखोलता असल्याचे जाणवते.

या प्रकरणात आपण कोळींच्या कवितेतील आशयविश्व पाहिले. पुढील प्रकरणात त्यांच्या कवितेच्या अभिव्यक्तीचे स्वरूप व वेगळेपण पाहूया.

---

## प्रकरण दुसरे

## संदर्भ सूची


| | | | |
|---|---|---|---|
| १) | कोळी, ज्ञानेश्वर | : | 'घन दाटलेले', प्रस्तावना. |
| २) | गुरव, बाबुराव | : | 'घन दाटलेले', मलपृष्ठावरील मजकूर. |
| ३) | माळगी, राजा | : | संवेदना, दीपावली विशेषांक, १९९९,पृ.३२ ते ३४. |
| ४) | कोळी, ज्ञानेश्वर | : | 'घन दाटलेले', प्रस्तावना. |
| ५) | कोळी, ज्ञानेश्वर | : | 'आयुष्याच्या वाटेवर', प्रस्तावना. |
| ६) | तत्रैव, | : | प्रस्तावना. |


---